सन २०२५ || ॐ चैतन्य सद्‌गुरु राममारुतये नमः || शके १९४७

# श्री संत राममारुती समाधी संस्थान, कल्याण.

(रजि नं. ए-१६२, ठाणे)

## श्री संत राममारुती महाराज (भिवंडीकर) यांचा

## १०७ वा पुण्यतिथी महोत्सव

**सोमवार दिनांक ८/९/२०२५ ते सोमवार दिनांक १५/९/२०२५**

**स्थळ - श्री संत राममारुती महाराज समाधी मंदीर, श्री संत राममारुती चौक, राममारुती रस्ता, कल्याण (प.)**



सद्‌भक्त हो,

श्री संत राममारुती महाराज (भिवंडीकर) यांचा १०७ वा पुण्यतिथी उत्सव भाद्रपद कृष्ण प्रतिपदा सोमवार दिनांक ८/९/२०२५ पासून भाद्रपद कृष्ण नवमी सोमवार दिनांक १५/९/२०२५ पर्यंत श्रींचे समाधीं मंदीरात साजरा होणार आहे. भाद्रपद कृष्ण नवमी सोमवार दिनांक १५/९/२०२५ रोजी पहाटे ५.१५ वा. श्रीं चा प्रयाणकाळ उत्सव साजरा करण्यात येणार असून त्याच दिवशी सायं. ५.०० वा. श्रीं च्या पादुकांची पालखीतून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

या पुण्यतिथी उत्सवात अखंड नामस्मरण (पहारा), किर्तन, भजन, प्रवचन, व्याख्यान, संगीत, प्रबोधनपर व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आपण सर्व कार्यक्रमास श्रध्देने, भक्ति भावाने उपस्थित राहून महाप्रसाद (अन्नदान) व श्रवण सुखाचा लाभ घ्यावा आणि उत्सव भव्य स्वरुपात साजरा करण्यासाठी संस्थानला सर्वतोपरी बहुमोल सहकार्य करावे व श्रीं च्या कृपा प्रसादाचा लाभ घ्यावा अशी आपणास नम्र विनंती. धन्यवाद !

**श्री सद्‌गुरु महाराजांचा सेवेकरी**
**शिरीष अनंत गडकरी**
अध्यक्ष व विश्वस्त
श्री संत राममारुती समाधी संस्थान, कल्याण

# दैनंदिन कार्यक्रम

## भाद्रपद कृष्ण प्रतिपदा सोमवार दिनांक ०८/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी १०.00 वा. | "श्रीं" चे समाधी व पादुकांवर लघुरुद्राभिषेक, पंचामृत महापूजा, पादुकांची स्थापना व अखंड नामःस्मरणाने उत्सवास सुरवात. हस्ते – मा. अध्यक्ष व विश्वस्थ श्री. शिरीष अनंत गडकरी व सौ. शितल गडकरी, ठाणे. |
| सकाळी १०.१५ वा. | **श्री सद्गुरुरायाची प्रदक्षिणा** श्री संत राममारुती भजनी मंडळ श्री संत आप्पामास्तर लेले भजनी मंडळ व ह.भ.प.वै. चिमणबुवा केंबुळकर यांचे दत्त प्रासादिक भजनी मंडळ, कल्याण. |
| सकाळी १०.३० वा. | **भजन :** श्री संत आप्पा मास्तर लेले भजनी मंडळ, कल्याण. |
| सकाळी ११.१५ वा. | **श्रीं च्या पोथीचे पारायण :** प. पू. स्व. अनंत यशवंत तथा बाबुराव गडकरी लिखित श्री राममारुती सच्चरित्र, श्री राममारुती स्तवन महात्म्य, श्री. राजन मधुकर सुळे, बडोदे लिखित राममारुती बावनी यांचे सामुदायिक पठण. |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी १.00 ते २.00 वा. | **भजन :** श्री संत राममारुती महाराज महिला भजनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी २.00 ते ३.00 वा. | **भजन :** ज्ञानाई भजनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी ३.00 ते ४.00 वा. | **भजन :** मुक्ताई महिला भजनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी ४.00 ते ५.00 वा. | **भजन :** बिल्वपत्र महिला भजनी मंडळ, अन्नपूर्णा नगर, कल्याण. |
| सायं. ५.00 ते ७.00 वा. | **वारकरी किर्तन :** ह.भ.प. श्री. विलास महाराज जंजिरे, कल्याण. |
| रात्रौ ७.00 ते ८.३० वा | **हरिपाठ, भजन व सांज आरती.** |

## भाद्रपद कृष्ण द्वितीया मंगळवार दिनांक ०९/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्रीं" चे समाधीवर पंचामृत महाअभिषेक पूजन<br>श्री गजानन महाराज शेगांव भक्त मंडळ, कल्याण<br>हस्ते – सौ. जयश्री व श्री. श्रीपाद दिगंबर जोशी, कल्याण.<br>श्री. ब्रह्मचैतन्य महाराज उपासना मंडळ, कल्याण<br>हस्ते – सौ. माधुरी व श्री. उदय यशवंत परळीकर, कल्याण |
| सकाळी ७.३० ते ९.00 वा. | **।। श्री राम नाम जप ।।** |
| सकाळी ९.00 ते १०.00 वा. | **भजन :** वीरशैव महिला भजनी मंडळ, कल्याण. |
| सकाळी १०.३० ते १२.३० वा. | नाथपंथी सिध्दयोगी **प.पू. देवेंद्रनाथ महाराज** प्रणित **नाथपंथी होम हवन** प्रमुख उपस्थिती **श्री. भूपेंद्रनाथ** तथा उल्हासबाबा देशमुख, कळवा. |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी १.00 ते २.00 वा. | **भजन :** त्रिवेणी महिला भजनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी २.00 ते ३.00 वा. | **भजन :** गजानन महाराज (शेगाव) महिला भजनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी ३.00 ते ५.00 वा. | **सांस्कृतिक व पारंपारिक कार्यक्रम**<br>सादरकर्त – श्री संत राममारुती कला केंद्र, कल्याण.<br>नेतृत्व – सौ. कस्तुरी सोनाळकर |
| सायं ५.00 ते ७.00 वा. | **वारकरी किर्तन :** ह.भ.प. मधुकर महाराज पाटील गुरुजी, कल्याण. |
| सायं. ७.00 ते ८.३० वा. | **हरिपाठ, भजन व आरती.** |
| रात्रौ ९.00 वा. पासून | **श्री सुंदरकांड :** सादरकर्ते – श्री सालासर बालाजी भक्त मंडळ, कल्याण. |

## भाद्रपद कृष्ण तृतीया (संकष्ट चतुर्थी) बुधवार दिनांक १०/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्री" चे समाधीवर पंचामृत महाअभिषेक पूजन.<br>प. पू. संत श्री गजानन महाराज पट्टेकर देवस्थान, ठाणे.<br>हस्ते – सौ. शितल व श्री. संदीप शशिकांत कुळकर्णी, पुणे.<br>सौ. निमिषा व देवांग, सौ. मनाली व भूषण तुषार समर्थ, खारघर. |
| सकाळी ९.०० ते १०.१५ वा. | **श्री गणपती अथर्वशिर्ष्याची सामुदायिक आवर्तने**<br>सादरकर्ते – चतुर्थी महिला भजनी मंडळ, कल्याण.<br>अध्यात्म मंडळ गजानन महाराज मंदीर, कल्याण<br>प्रथमेश मैत्रीणी मंडळ, कल्याण.<br>अन्नपूर्णा नगर आघाडी मंडळ, कल्याण.<br>दि महिला सहकारी उद्योग मंदिर, कल्याण |
| सकाळी १०.३० ते १२.१५ वा. | **प्रवचन** – १००८ श्री महंत तपोमुर्ती परमहंस सद्‌गुरु श्री विणाभारती महाराज, नाशिक. **विषय – । हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।** |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी २.०० ते ५.०० वा. | **श्री ज्ञानेश्वरी पारायण :** श्री ज्ञानेश्वरीच्या १२ व्या व १५ व्या अध्यायांचे सामुदायिक पठण – सहभाग – श्री विठ्ठल रुक्मीणी महिला भजनी मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कल्याण.<br>नेतृत्व – ह.भ.प. सौ. कुंदाताई उगले, कल्याण. |
| सायं. ५.०० ते ७.०० वा. | **वारकरी किर्तन –** ह.भ.प. श्री. संदीप महाराज डुंबरे, कल्याण. |
| सायं. ७.०० ते ८.३० वा. | **हरिपाठ, भजन व आरती.** |

## भाद्रपद कृष्ण चतुर्थी गुरुवार दिनांक ११/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्री" च्या समाधीवर पंचामृत महाअभिषेक पूजन.<br>हस्ते – सौ. शुभांगी व श्री. जयंत रघुनाथ परांजपे, कल्याण.<br>विश्वस्थ – सद्‌गुरु श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर संस्थान, गोंदवले |
| सकाळी ७.३० ते ९.०० वा. | **श्री नामाचा तास** ।। श्री राम । जयराम । जय जय राम ।। सवाद्य नामजप. |
| सकाळी ९.३० ते १२.३० वा. | **श्रीमद् भगवद्‌गीता पठण.**<br>श्री गुरुकुलम न्यास, कल्याण – नेतृत्व सौ. मंजिरी फडके, कल्याण. |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी १.०० ते २.०० वा. | **भजन –** ज्ञानेश्वरी महिला भगिनी मंडळ, कल्याण. |
| दुपारी २.०० ते ३.०० वा. | **भजन –** स्वस्तिक भजन मंडळ, ठाणे. |
| दुपारी ३.०० ते ५.०० वा. | **भक्ति रंग –** गायक अमेय गावण, ठाणे. |
| सायं. ५.०० ते ७.०० वा. | **वारकरी किर्तन –** ह.भ.प. श्री. अर्जुन महाराज सरजिने, कल्याण. |
| सायं. ७.०० ते ८.३० वा. | **हरिपाठ, भजन व आरती.** |

## भाद्रपद कृष्ण पंचमी शुक्रवार दिनांक १२/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्रीं" चे समाधीवर पंचामृत महाअभिषेक पूजन.<br>हस्ते – सौ. श्रध्दा व श्री. मधुर अरुण पाठक गुरुजी, कल्याण. |
| सकाळी ९.०० ते १२.३० वा. | **श्री दुर्गा सप्तशती** पाठाचे सामुदायिक पठण.<br>सहभाग – नवदुर्गा सप्तशती महिला मंडळ, कल्याण. |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी १.०० ते २.०० वा. | **भजन :** स्वरांजली महिला भजनी मंडळ, वाडेघर, कल्याण. |
| दुपारी २.०० ते ३.०० वा. | **भजन :** महालक्ष्मी भजनी मंडळ, संचालिका श्रीदेवी कुल्लूर, कल्याण. |
| दुपारी ३.०० ते ५.०० वा. | **भक्तीनाट्यरंग**<br>सादरकर्त्या – केतकी घारपुरे, कल्याण. |
| सायं. ५.०० ते ७.०० वा. | **वारकरी किर्तन –** ह.भ.प. श्रीपाद बाळकृष्ण कुलकर्णी<br>विश्वस्त : श्री संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, नाशिक. |
| सायं. ७.०० ते ८.३० वा. | **हरिपाठ, भजन व आरती** |
| रात्रौ ९.०० ते १०.०० वा. | आर्ट ऑफ लिव्हींग **सत्संग** (गुरुदेव श्री श्री रविशंकर) |

## भाद्रपद कृष्ण षष्ठी/सप्तमी शनिवार दिनांक १३/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्रीं" चे समाधीवर पंचामृत महाअभिषेक पूजन.<br>श्री संत माऊली शांतारामभाऊ जयवंत एकनाथ मंदीर संस्थान, भिवंडी.<br>हस्ते – सौ. वीणा व विवेक शरद कर्णिक, ठाणे. |
| सकाळी ९.०० ते १.०० वा. | **श्री विष्णू सहस्त्रनाम व श्रींचे समाधीवर तुळशीपत्र अर्पण सोहळा**<br>सहभाग – श्री विष्णू सहस्त्रनाम सेवा मंडळ, कल्याण |
| दुपारी १.०० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी २.०० ते ३.०० वा. | **भजन :** चां.का.प्रभू स्नेहदा महिला भजनी मंडळ, ठाणे. |
| दुपारी ३.०० ते ५.०० वा. | पुष्पाताई लेले संचलित – **स्वर संवादिनी संस्था, ठाणे** आयोजित –<br>भारुड, गोंधळ, जोगवा, दिंडी व भक्ति गीतांचा बहारदार कार्यक्रम. |
| सायं. ५.०० ते ७.०० वा. | **वारकरी किर्तन : भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथजी महाराज पाटील,**<br>सरळांबे, ता. शहापूर, जि. ठाणे. |
| सायं. ७.०० ते ८.३० वा. | **हरिपाठ, भजन व आरती** |
| रात्रौ ९.०० वा. | **मंत्रपुष्प –** वे.शा.सं. ज्योतिषाचार्य श्री. मधुर अरुण पाठक गुरुजी<br>व सहकारी, कल्याण |
| रात्रौ ९.३० ते १०.३० वा. | **भक्ति संगीत :** श्री. रानडे कुटूंबिय, कल्याण. |

## भाद्रपद कृष्ण अष्टमी रविवार दिनांक १४/०९/२०२५

| | |
|---|---|
| सकाळी ७.३० वा. | "श्री" चे समाधीवर पंचामृत महाअभिषेक व पूजन.<br>हस्ते – सौ. शिल्पा व बिपीन गजानन देशपांडे, ठाणे. |
| सकाळी ९.०० ते १०.०० वा. | **।। श्री रामरक्षा, मारुती स्तोत्र, हनुमान चालीसा व समर्थ उपासना ।।**<br>यांचे सामुदायिक पठण. नेतृत्व – सुप्रियाताई आठवले, कल्याण. |
| दुपारी १०.३० ते १२.३० वा. | सी.के.पी. सोशल क्लब ठाणे, कराओके ग्रुप सादर करीत आहे<br>**"तुझ्या कृपेने"** मराठी, हिन्दी गीतांचा सुमधुर कार्यक्रम.<br>संकल्पना व संयोजन – श्री. हेमंत रणदिवे, सौ. शितल गडकरी, ठाणे<br>निवेदन – ज्योती टिपणीस, ठाणे. |
| दुपारी १२.३० वा. | **श्रीं** ची मध्यान्ह आरती. |
| दुपारी २.०० ते ३.०० वा. | **भजन :** जय जानकी महिला भजनी मंडळ, ठाणे. |
| दुपारी ३.०० ते ५.०० वा. | **व्याख्यान :** सौ. प्राची गडकरी, डोंबिवली – विषय **"संवाद"** |
| सायं. ५.०० ते ७.०० वा. | **वारकरी किर्तन–**भाषाप्रभू ह.भ.प. **जगन्नाथजी महाराज पाटील,** शहापूर, |
| सायं. ७.०० ते ९.०० वा. | **अष्टपदी भजन : श्रीमंत संत माऊली शांतारामभाऊ जयवंत**<br>एकनाथ मंदीर भजनी मंडळ, भिवंडी. |
| रात्रौ १०.०० वा. पासून | **संगीतसेवा –** सादरकर्ते – श्री. प्रतिक फणसे आणि सहकारी, कल्याण |

## भाद्रपद कृष्ण नवमी सोमवार दिनांक १५/०९/२०२५

| | |
|---|---|
| रात्रौ २.०० वा. पासून | **ब्रह्ममूर्ती सद्गुरु माऊली राममारुतीराया यांच्या पवित्र प्रयाणकाळ पुण्यस्मरण दिनानिमित्त श्रींस अभ्यंग स्नान व महालघुरुद्राभिषेक.**<br>हस्ते – अध्यक्ष सौ. शितल व शिरीष गडकरी, ठाणे. |
| पहाटे ३.०० ते ५.०० वा. | **श्रीं च्या प्रयाणकाळाचे भजन –** श्री संत महंत भक्तगण व<br>श्री सद्गुरु नारायण सेवा मंडळ, श्रींगोंदे, जि. अहमदनगर. |
| पहाटे ५.१५ वा. | **श्रीं सद्गुरु राममारुतीरायांचा प्रयाणकाळ उत्सव.** |
| सकाळी ६.०० वा. | **श्रींस** काकड आरती, भजन. |
| सकाळी ८.३० ते ९.३० वा. | सलग ११ वेळा सामुदायिक श्री रामरक्षा व मारुती स्तोत्र पठण<br>सहभाग – आनंदी भजनी मंडळ, कल्याण |
| सकाळी १०.०० ते १२.०० वा. | **काल्याचे किर्तन –** भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथजी महाराज पाटील, शहापूर<br>काला प्रसाद व अखंड नामस्मरण (पहारा) समाप्ती |
| दुपारी १२.०० ते २.०० वा. | **महाप्रसाद भंडारा** |
| दुपारी ३.०० ते ४.३० वा. | **भजन :** सद्गुरु श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ, फॉरेस्ट कॉलनी,कल्याण |
| सायं. ५.०० वा. पासून | **श्रीं च्या पादुकांची पालखीतून भव्य मिरवणूक व आरती प्रसाद** |

## विशेष सुचना :

१) भाद्रपद शुध्द पौर्णिमा रविवार दिनांक ७/९/२०२५ रोजी सकाळी ९.०० वा. श्री जगदंबा मंदीर, दळवी वाडा, कल्याण येथे पादुका पूजन करुन श्रींच्या पादुकांचे मंदीरात आगमन होईल.
२) दररोज सकाळी काकड आरती श्री राममारुती भजनी मंडळ यांचे तर्फे होईल.
३) दररोज सायंकाळी हरिपाठ भजन दत्त प्रासादिक भजनी मंडळ, कल्याण यांचे वतीने होईल.
४) उत्सवकाळात श्रीं च्या समाधीवर पंचामृत महापूजा करु इच्छिणाऱ्यांनी रु. ३५१/– ची पावती घेवून दिवस ठरवून घ्यावा. प्रसाद पोस्टाने पाठविला जाईल.
५) श्रीं चे समाधीवर अभिषेक करायचे असतील त्यांनी रु. ५१/– ची अभिषेक पावती कार्यालयातून घ्यावी.
६) भक्तांना देणगी रुपाने शिधा देणे आहे त्यांनी तो मंदीरात आणून द्यावा व पावती घ्यावी.
७) उत्सव काळात अखंड नामस्मरण (पहारा) नित्य नियमाने करावयाचे असल्यास आपले नाव नोंदवून वेळ ठरवून घ्यावी.
८) श्रीं ची पालखी मंदीरातून निघून दुधनाका, पारनाका, शंकरराव चौक व तेथून दुधनाका मार्गे मंदीरात परत येईल याची नोंद घ्यावी.
९) कार्यक्रमातील फेरबदल फलकार जाहीर केले जातील.
१०) रु. २०००/– किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्यांनी कृपया आपला पॅन नं. द्यावा ही विनंती.
११) मंदीराजवळ पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.
१२) महाप्रसादाची वेळ सकाळी १२.०० ते २.०० व रात्री ७.०० ते ९.०० पर्यंत असेल. तरी सर्वांनी वेळेचे बंधन पाळावे व सहकार्य करावे ही विनंती.

---

श्री सद्गुरु राममारुती महाराजांचा नऊ दिवस होणाऱ्या पुण्यतिथी उत्सवात संपूर्ण दिवस येणाऱ्या प्रत्येक सद्भक्तांसाठी चहा/कॉफीची व्यवस्था असतेच शिवाय सकाळ संध्याकाळ दोन्ही वेळेला मोठ्या प्रमाणात अन्नदानाची सेवा (महाप्रसाद) ही उपलब्ध असते. या सेवेत खारीचा वाटा आपण ही स्विकारु शकता.

आपणास नम्र विनंती श्रींच्या उत्सवाकरीता आर्थिक सहाय्या बरोबर अन्नदानाकरीता विशेष सहकार्य करावे.

Online अन्नदानासाठी देणगी दिलेल्या देणगीदारांचे नावे व तपशिल फलकावर लिहीला जाईल. आपले सहकार्य मौल्यवान आहे.

देणगी देणाऱ्या भाविक भक्तांसाठी बँकेचा तपशिल देत आहे. आपल्या देणगीची Screen Shot Print यांचेकडे नावासहीत पाठवावी. म्हणजे पावती देण्यास सोपे होईल.

संपर्क :– **शिरीष अनंत गडकरी – विश्वस्त व अध्यक्ष** मो. नं. ९८१९७७०३०१
**सुरेश रामचंद्र देशपांडे – विश्वस्त व खजिनदार** मो. नं. ७७३८२६५०००
**पराग विनायक कर्णिक – चिटणीस** मो. नं. ९२२०९१६५२४

**सढळ हस्ते देणगी देणाऱ्या भाविक भक्तांसाठी बँकेची माहीती.**

**Bank Name & Address :**

**Details for sending donation by NEFT / Net banking**

1) **Beneficiary Name :** Shri Sant Rammaruti Samadhi Sansthan, Kalyan
IDBI Bank - Niwara Complex, Tilak Chowk, Kalyan (W), Maharashtra - 421 301.
S.B. A/c No. 45610010008953, IFSC - IBKL0000456, MICR - 400259052

2) **Beneficiary Name :** Shri Sant Rammaruti Samadhi Sansthan, Kalyan
**Name of Bank :** The Kalyan Janata Sahakari Bank, Ltd.
**Bank Address :**
Main Branch, Gayan Samaj, Tilak Chowk, Kalyan (W) - 421301
S.B. A/c No. 002010100061620, IFSC - KJSB0000002, MICR - 400367002

# ईश्वर नाम भाषेचे जनक
# श्री संत सद्‌गुरु राममारुती महाराज

युनो तर्फे २००५ साली केलेल्या पहाणीनुसार जगात ६९१२ भाषा बोलल्या जात होत्या. भाषा तज्ञांच्या मते दर पंधरा दिवसानी जगातील एक भाषा कायमची नष्ट होते. अशीच एक 'ईश्वर नाम भाषा' १८९३ साली निर्माण झाली आणि २८ सप्टेंबर १९१८ रोजी नष्ट झाली. त्या भाषेचे वैशिष्ट म्हणजे ती एका व्यक्तिने निर्माण केली पंचवीस वर्षे वापरली ह्या पंचवीस वर्षात त्यांनी इतर कोणत्याही भाषेचा वापर केला नाही. जगात ती भाषा फक्त त्यांनीच वापरली व त्यांच्या अवतार समाप्ती नंतर ती भाषा नष्ट झाली. ही सुध्दा ईश्वराचीच इच्छा दुसरे काय ?

ईश्वरनाम भाषेचा जन्म एका चमत्कारिक प्रसंगातून झाला. ह्या भाषेचे जनक श्री संत सद्‌गुरु राममारुती महाराज १८९३ साली काशीक्षेत्री आपल्या गुरुबंधू समवेत एका महत्वाच्या सिध्दांतावरील चर्चा ऐकण्यासाठी गेले होते. तेथे काशी क्षेत्रातील जेष्ठ पंडित व अनेक विद्वान व्यक्ती हजर होत्या. या सिध्दांतावर खुप वादविवाद सुरु होता. महाराजांच्या गुरुबंधूंनी सिध्दांतावर योग्य प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला परंतु मोठ्या विद्वान पंडितांचे समाधान झाले नाही. आपल्या गुरुबंधू चे बोलणे योग्य असले तरी ते समजावून सांगण्यात येत असलेली अडचण लक्षात घेऊन त्याला मदत करण्याच्या उद्देशाने इतका वेळ शांतपणे गप्प बसलेल्या श्री संत सद्‌गुरु राममारुती महाराजांनी स्वतः पुढे होऊन प्रतिपादन केले व त्या सिध्दांताचा सर्व मान्य निर्णय त्याच बैठकीत झाला. ते प्रतिपादन व एकंदरीत सादरीकरण पाहून काशीतील थोर विद्वान पंडितांनी महाराजांचा गौरव केला. महाराजांची योग्यता कळून आल्याने सर्वांना महाराजांबद्दल आदर निर्माण झाला पण महाराजांचे गुरुबंधू मात्र नाराज झाले. त्यांनी महाराजांना सांगितले कि तुमचे भाष्य योग्य व निर्णयात्मक असले तरी त्यामुळे मला थोडा कमीपणा आला. हे बरोबर झाले नाही. कारण मी येथील कायमचा रहिवाशी आहे. हे ऐकून महाराजांचे मन उदास झाले. नकळत का होईना आपल्यामुळे आपल्या गुरुबंधूना त्रास झाला आपल्या गुरुबंधूच्या मनातील आशय जाणून महाराजांनी गुरुबंधूच्या पायावर डोके ठेवून क्षमा मागितली व 'अशा वादासाठी यापुढे मी भाषा वापरणार नाही आजच मी माझी जिव्हा आपल्याला सद्‌गुरु रुप मानून सद्‌गुरु चरणी वहात आहे' असे म्हणून प्राकृत भाषेचा त्याग केला.

महाराजांना प्राकृत भाषेचा त्याग करुन मौन पाळणे शक्यच नव्हते. त्यांनी अल्पावधीतच स्वतःची एक स्वतंत्र 'ईश्वर नाम भाषा' तयार केली. त्यात ईश्वराची फक्त २२ नावे वापरली रामचंद्र या नावाचा उपयोग केवळ ईश्वर नाम घेण्यासाठीच होत असे. आनंदमय स्तिनी दर्शविण्यासाठी 'श्रीराम' शब्द वापरला जात असे. या भाषे संबंधी अधिक माहीती हवी असल्यास प. पू. स्व. अनंत यशवंत तथा बाबुराव गडकरी लिखित श्री राममारुती सच्चरित्र, श्री राममारुती स्तवन महात्म्य या पोथ्यांमध्ये व सौ. आशाताई अशोक गडकरी लिखित ।। शरण शरण हनुमंता । तुज आलो रामदुता ।। या राममारुती महाराजांच्या गद्य चरित्रात मिळेल.

महाराज या स्व निर्मीत भाषेत व्यवहारीक व परमार्थिक विषयावर सुध्दा ओघवत्या भाषेत प्रतिपादन करीत. त्यांच्या बोलण्याचा अर्थ सामान्य लोकांना सुध्दा अल्पसहवासाने स्पष्ट समजत असे. इतकेच नाही तर ही कर्णमधुर भाषा अशीच त्यांच्या तोंडून ऐकत रहावे अशी प्रबळ इच्छा होत असे. विशिष्ट व्यक्तिंचे नाव किंवा न समजलेले वाक्य ते दगडी रुळाने पाटीवर लिहून दाखवित. याच ईश्वरनाम भाषेत महाराज त्यांच्याकडे येणाऱ्या शाळकरी मुलांना अवघड गणिते सोडवून देत त्यांच्या रिती सुध्दा समजावून सांगत. याच भाषेत महाराज अनेक विद्वान व्यक्तिंबरोबर तत्वज्ञानावर चर्चा करीत.

महाराजांची ईश्वर नाम भाषा ही फक्त बावीस शब्दांची तरी परीपूर्ण होती. या भाषेशिवाय इतर कोणत्याही भाषेचा एकही शब्द तोंडातून कधीही न निघणे व बावीस ईश्वरनामा शिवाय एकही कुठलेही ईश्वरनाम तोंडातून न निघणे याला प्रचंड मनोनिग्रह, दृढनिश्चिय व जागरुक बुध्दी इत्यादि महान गुणांचा समुच्चय व्यक्तिच्या ठीकाणी असणे आवश्यक आहे. त्यांच्या अलौकिक साधुत्वाने व सामर्थ्याने ही ईश्वरनाम भाषा शेवटपर्यंत अगदी जन्म जात भाषा असल्यासारखी वापरली. हे एका सिध्द योग्यालाच जमू शकते. महाराजांनी ही भाषा विवक्षित रितीने बसविली होती. ते ती भाषा इतके जलद बोलत की जणू काय आपल्या व्यवहारातील भाषा आहे असा भास होई. महाराजांनी १८९३ पासून २८ सप्टेंबर १९१८ म्हणजे समाधीकाळा पर्यंत जवळ जवळ पंचवीस वर्षे हि भाषा उपयोगात आणली.

ईश्वरनाम भाषा अल्पावधीत तयार केली. फक्त त्यांनीच स्वतः पंचवीस वर्षे वापरली व त्यांच्या समाधी नंतर त्या भाषेचा अस्त झाला हि सुध्दा ईश्वराचीच इच्छा ! दुसरे काय ? ही जगातील एकमेव भाषा ठरावी.

– दिलीप गडकरी, कर्जत

# कार्यकारी मंडळ :- एप्रिल २०२२ ते मार्च २०२७


❊ विश्वस्त ❊

श्री. शिरीष अनंत गडकरी, ठाणे
श्री. विश्राम शंकर दुर्वे, कल्याण
श्री. दिलीप मधुकर दळवी, कल्याण
श्री. सुरेश रामचंद्र देशपांडे, कल्याण
श्री. तुषार सुधीर समर्थ, खारघर, नवी मुंबई.

❊ अध्यक्ष ❊
श्री. शिरीष अनंत गडकरी, ठाणे

❊ उपाध्यक्ष ❊
श्री.चंद्रकांत अनंत चित्रे, मुलुंड

❊ खजिनदार ❊
श्री. सुरेश रामचंद्र देशपांडे, कल्याण

❊ चिटणीस ❊
श्री. पराग विनायक कर्णिक, कल्याण

❊ सहचिटणीस ❊
श्री. केदार दिपक सोनाळकर, कल्याण

❊ सहचिटणीस ❊
श्री. दिपक विठ्ठल शहाणे, कल्याण

❊ सभासद ❊

सौ. उर्मिला उदय फणसे, कल्याण
श्री. संजय विश्वनाथ कर्णिक, ठाणे
श्री. यज्ञेश सुरेंद्र वैद्य, ठाणे
श्री. गणेश लालदास खैरनार, कल्याण
सौ. अर्चना अनिलकुमार टिपणीस, कल्याण
श्री. शेखर प्रभाकर खोपकर, डोंबिवली
श्री. नितीन शशीधर दळवी, कल्याण
श्री. चंद्रशेखर मोरेश्वर राजवाडे, कल्याण
श्रीमती प्राची प्रशांत कारखानीस, ठाणे
श्रीमती अंजली प्रशांत पाटणकर, ठाणे

वैधानिक लेखापरीक्षक : पी. एन्. कोठारी ॲन्ड कं. ठाणे C.A.
कायदेशीर सल्लागार : ॲड. मंदार विश्राम दुर्वे, कल्याण


## ।। श्री राममारुतीरायांची आरती ।।

जय देव जय देव राममारुतीराया । ओवाळू आरती तुजला गुरुवर्या ।। धृ।।
कायस्थ प्रभु कुळी घेऊनि अवतार । राममारुती नामें सगुणी संचार ।।
ब्रह्मचर्य व्रत अखंड साचार । श्‍वासो श्‍वासी राम मंत्र उच्चार ।।१।।जय देव।।
बाल मुकुंद गुरु जाता कैवल्याधामी । भाषा त्यागून वाणी अर्पियली नामी ।
शिव शिव विठ्ठल मारुती जय जय श्रीराम । सहजवस्थी ओमकार उमटे सप्रेम ।।२।।जय देव ।।
किर्तन भजनारंगी प्रेम अनीवार । आनंदे डुल्लता देही विसर ।
हूंकार उड्डाणे घेऊनी अपार । दासा दाखविला हा मारुती अवतार ।।३।।जय देव ।।
निजदांसा दाऊनिया नव भक्ति सार । ज्ञानामृत पाजुनियां नेलें त्या पार ।
शांती सुख आनंद जेथे अपार । तयां स्थानी नेऊनी केले त्या स्थीर ।।४।।जय देव ।।
भाद्र कृष्ण नवमी अठरासे चाळीस । शनिवारी गार्गी निजधामी वास ।
आरती ओवाळी प्रेमे हा दास । दर्शन देऊनी तयां पुरवावी आस ।।५।।जय देव ।।

प्रति,
श्री./श्रीमती ____________________

____________________

**श्री संत राममारुती महाराजांच्या वेबसाईटला अवश्य भेट द्या.**
**www.rammarutimaharai.org**